हिंदु जनजागृती समिती पुरस्कृत ग्रंथ !

आदर्श राष्ट्ररचना : राष्ट्रजागृती – खंड २

# लोकशाहीतील दुष्प्रवृत्तींविरुद्ध करायच्या प्रत्यक्ष कृती

मराठी (Marathi)


**संकलक**

हिंदु राष्ट्र-स्थापनेचा उद्घोष करणारे
सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले

श्री. रमेश हनुमंत शिंदे (प्रवक्ते, हिंदु जनजागृती समिती)

श्री. चेतन धनंजय राजहंस (प्रवक्ते, सनातन संस्था)




## सनातन संस्था


एप्रिल २०२३ पर्यंत सनातनच्या ३६१ ग्रंथांच्या मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, कन्नड, तमिळ, तेलुगु, मल्ल्याळम्, बंगाली, ओडिया, आसामी, गुरुमुखी, सर्बियन, जर्मन, स्पॅनिश, फ्रेंच आणि नेपाळी या १७ भाषांत ९३ लाख ३९ सहस्र प्रती !

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ 'सनातन संस्थे'ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी 'गुरुकृपायोग' या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून २५.३.२०२३ पर्यंत १२३ साधक संत झाले, तर १,०८७ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक 'सनातन प्रभात'चे संस्थापक-संपादक

५. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. 'हिंदु राष्ट्रा'च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना दिशादर्शन !

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !**


स्थूल देह असे स्थलकालाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वा ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६



**श्री. रमेश शिंदे (प्रवक्ता, हिंदु जनजागृती समिती)**

‘सनातन धर्मभूषण’, ‘हिंदु कुलभूषण पुरस्कार’ आदी पुरस्कारांनी सन्मानित असून धर्मप्रसारक म्हणून देशभर प्रवास करतात. ‘बुद्धीप्रामाण्यवाद्यांचा अहंकार’, धर्मांतर, ‘हिंदु राष्ट्र’, ‘मनुस्मृति’, ‘लोकशाहीतील दुष्प्रवृत्ती’ आदी विषयांवरील सनातनच्या ग्रंथांचे संकलक आहेत.

---



**श्री. चेतन राजहंस (प्रवक्ता, सनातन संस्था)**

‘सनातन धर्मवीर’ उपाधीने सन्मानित असून विविध दूरचित्रवाहिन्यांवर हिंदु धर्माची बाजू मांडतात. सनातनच्या ग्रंथांचे संकलन आणि हिंदूसंघटनार्थ प्रवास करतात. गोवा येथील ‘अखिल भारतीय हिंदु राष्ट्र अधिवेशना’च्या आयोजनात सक्रीय सहभाग असतो.

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या ‘सच्चिदानंद परब्रह्म’ या उपाधीविषयी विवेचन !

‘१३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये ‘प.पू.’ आणि ‘परात्पर गुरु’ या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

---

## सनातनच्या दोन सद्गुरूंच्या नावांच्या आधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

नाडीपट्टी–वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ’ आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ’ असे संबोधले जात आहे. या संतद्वयी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत.

# ग्रंथाची अनुक्रमणिका


१. विकसित प्राचीन धर्माधिष्ठित भारत आणि भ्रष्ट धर्मनिरपेक्ष भारतीय लोकशाही ! १०

२. लोकशाहीतील दुष्प्रवृत्तींविरुद्ध लढा देण्याचे महत्त्व १३

२ अ. अन्याय सहन करणे, हे पाप आहे ! १३

२ उ. हिंदु राष्ट्र-स्थापनेच्या (व्यवस्था परिवर्तनाच्या) दृष्टीने आवश्यक ! १३

३. लोकशाहीतील दुष्प्रवृत्तींविरुद्ध लढा देण्यासाठी आवश्यक गुण १८

३ अ. मानसिकदृष्ट्या १८

३ आ. आध्यात्मिकदृष्ट्या १८

४. लोकशाहीतील दुष्प्रवृत्तींविरुद्ध लढा देण्याची पद्धत ! २२

४ अ. 'काट्याने काटा काढतात', तसे लोकशाहीतील दुष्प्रवृत्तींविरुद्ध लोकशाहीमार्गाने लढा ! २२

४ आ. माहितीच्या अधिकाराचा वापर करा ! २२

४ इ. तक्रारी आणि निवेदने यांद्वारे आपल्या न्याय्य मागण्या संबंधितांपर्यंत पोहोचवा ! ३३

४ ई. पोलीस ठाण्यात तक्रारी नोंदवा ! ३३

४ उ. जनआंदोलने आणि निदर्शने करा ! ३८

४ ऊ. जनहित याचिकांद्वारे न्यायालयीन मार्गाने लढा द्या ! ४४

४ ए. दुष्प्रवृत्तींची संवैधानिक मार्गाने सामाजिक अपकीर्ती करा ! ४६

४ ऐ. व्यक्तीगत स्तरावर लढा देतांना आपली आवड आणि क्षमता यांनुसार कृती करा ! ४८

४ ओ. संघटनात्मक स्तरावर लढा देतांना संघटनेची ध्येयधोरणे आणि कार्यशैली यांनुसार लढा द्या ! ४८

**५. शासकीय क्षेत्रांतील दुष्प्रवृत्तींविरुद्ध कसा लढा द्यावा ? ४९**

५ आ. शासकीय कार्यालयातील दुष्प्रवृत्ती ५१

५ इ. पोलीसयंत्रणेतील दुष्प्रवृत्ती ५५

**६. वैद्यकीय क्षेत्रातील दुष्प्रवृत्ती ६७**

**७. शिक्षण क्षेत्रातील दुष्प्रवृत्ती ७७**

**८. वाणिज्य क्षेत्रातील दुष्प्रवृत्ती ८०**

८ आ. दुकानदारांमधील दुष्प्रवृत्ती ८०

८ इ. पेट्रोलपंपावरील दुष्प्रवृत्ती ८३

८ ई. भेसळखोर दुष्प्रवृत्ती ८५

**९. पत्रकारितेच्या क्षेत्रातील दुष्प्रवृत्ती ९१**

९ अ. पत्रकारितेतील दुष्प्रवृत्तींच्या संदर्भातील उदाहरणे ९२

९ आ. वर्तमानपत्रांतील दुष्प्रवृत्तींच्या विरोधात कसे लढावे ? ९३

**१०. अश्लीलता पसरवणाऱ्या दुष्प्रवृत्ती ९७**

१० अ. अश्लीलतेच्या संदर्भात जनजागृती करा ! ९८

१० आ. अश्लीलता पसरवणाऱ्यांच्या विरोधात कसा लढा द्यावा ? ९८

**११. समाजसेवक, देशभक्त आणि धर्मप्रेमी यांना आवाहन ! ९८**

**१२. लोकशाहीतील दुष्प्रवृत्तींविरुद्ध लढा देणे, हा व्यवस्था-परिवर्तनाचा पहिला टप्पा, तर रामराज्याची अनुभूती देणाऱ्या ‘हिंदु राष्ट्रा’ची स्थापना हा अंतीम टप्पा ! ९९**

## ग्रंथाचे मनोगत

भारताला ‘रामराज्य’, सम्राट युधिष्ठिर यांचे ‘धर्मराज्य’ आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे ‘हिंदवी स्वराज्य’ या आदर्श राजकीय व्यवस्थांची परंपरा आहे. असे असूनही त्यांच्या तुलनेत आजची राजकीय व्यवस्था असलेली भारतीय लोकशाही अपयशी म्हणण्याची पाळी आली आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे राजकारण आता केवळ मदांध लोकांचे सत्ताकारण बनलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, ‘एखाद्या देशाचे संविधान कितीही चांगले असले, तरी ते राबवणाऱ्या व्यक्तीच जर असक्षम असतील, तर लोकशाही अपयशी ठरते.’ त्यामुळे केवळ राज्यघटना आणि लोकशाही चांगली असून उपयोग नाही, तर ती ज्यांच्या हातात आहे, ते राजकारणी निःस्वार्थी, प्रजाहितदक्ष आणि कर्तव्यपरायण असायला हवेत.

आज राज्यव्यवस्था, शिक्षण, आरोग्य, न्यायव्यवस्था, पोलीस, प्रशासन, कृषी, संरक्षण आणि अर्थ अशा सर्वच व्यवस्थांमध्ये भ्रष्टाचार, अकार्यक्षमता अन् अधिकारशाही यांचे प्रस्थ वाढलेले दिसून येत आहे. आपल्या प्रत्येकालाच याचा अनुभव प्रतिदिन येत असतो. सर्वांच्या मनात याविषयी चीड असते; मात्र ‘आपल्याकडे अन्य पर्याय नाही’, ‘आपले काम त्वरित व्हायला हवे’ किंवा ‘मी एकटा या व्यवस्थेशी कसा लढणार’, अशा विचारांनी आपणही याच भ्रष्ट व्यवस्थेचा भाग बनतो. असे सतत होत राहिल्यास मग ‘रामराज्य’ आणि ‘शिवशाही’ केवळ कथांमधून सांगण्यासाठी राहील. या दृष्टीनेच केवळ राजकीय व्यवस्थेवर टीका करून न थांबता, ‘हे राष्ट्र माझे आहे, ही माझी मातृभूमी आहे आणि या समाजाचा मी एक घटक आहे’, या दृष्टीने सामाजिक कर्तव्य म्हणून आपल्याला या भ्रष्ट व्यवस्थेच्या विरोधात उभे राहिले पाहिजे. क्रांतीविरांनी आपल्या हाती हे स्वराज्य सोपवलेले असले, तरी त्याचे सुराज्यात रूपांतर करण्याचे दायित्व आपल्यावर आहे, हे आपण विसरता कामा नये. म्हणून अन्याय सहन न करता आता त्याच्या विरोधात लढून तो रोखण्यासाठी आपण निर्धार केला पाहिजे. यासाठीच या ग्रंथात वर्तमानकाळात सामाजिक

आणि शासकीय यंत्रणांकडून जनतेची होणारी पिळवणूक रोखण्यासाठी करावयाच्या कायदेशीर कृती यांचे थोडक्यात मार्गदर्शन केलेले आहे.

आपण प्रत्येकाने ध्येयनिष्ठ बनून आणि संघटित होऊन अन्याय करणाऱ्या दुष्प्रवृत्तींच्या विरोधात कृती केल्यास निश्चितच पुढच्या पिढीसाठी एका आदर्श राज्यव्यवस्थेचा, म्हणजेच रामराज्याची अनुभूती देणाऱ्या 'हिंदु राष्ट्रा'चा पाया रचला जाईल. या ग्रंथातून आदर्श राष्ट्रउभारणीसाठी लोकशाहीत प्रबळ झालेल्या सामाजिक आणि शासकीय दुष्प्रवृत्तींच्या विरोधात वैध मार्गाने लढण्याची प्रेरणा आपल्याला मिळावी, ही प्रभु श्रीरामाच्या चरणी प्रार्थना ! – **संकलक**

## वाचकांना निवेदन

१. प्रस्तुत ग्रंथातील विवरण हे विद्यमान कायद्यांनुसार आहे. केंद्र आणि राज्य शासन यांच्याकडून वेळोवेळी कायद्यांमध्ये सुधारणा केल्या जातात. त्यामुळे या दुष्प्रवृत्तींच्या विरोधात लढण्यासाठी कायद्यांमध्ये अधिक सुविधाजनक तरतूद आढळल्यास ती या ग्रंथाच्या प्रकाशकांना आवर्जून कळवा. ती माहिती नवीन आवृत्तीच्या वेळी प्रसिद्ध करता येईल.

२. प्रस्तुत ग्रंथात सर्व माहिती अद्ययावत देण्याचा प्रयत्न केलेला आहे; मात्र काही शासकीय कार्यालयांच्या दूरभाष क्रमांकांमध्ये पालट होतो किंवा तक्रार करण्यासाठी नवीन सुविधा (उदा. संकेतस्थळ, टोल फ्री क्रमांक) उपलब्ध केल्या जातात. अशी माहितीही प्रकाशकांना कळवल्यास ती अद्ययावत करून नवीन आवृत्तीच्या वेळी प्रसिद्ध करता येईल.

## 'पृष्ठ क्रमांक २' वरील सूक्ष्मातील प्रयोगाचे उत्तर

प्रस्तूत ग्रंथाच्या मुखपृष्ठाकडे अधिक काळ पहाता येणार नाही किंवा त्यातून शक्ती प्रक्षेपित होत असल्याची स्पंदने जाणवतील. लोकशाहीतील दुष्प्रवृत्तींच्या निर्मूलनाच्या कार्यासाठी शक्ती आवश्यक असल्याने त्यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठाची रंगसंगती केलेली आहे. – **संकलक**